# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.२७/०८/२०२४

## प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत शहरातील नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना केल्या जात आहेत. महानगरपालिकेच्या रुग्णालये व माता बाल संगोपन केंद्रे येथील दाखल आंतर रुग्णांसाठी एम.आर.आय., सिटी स्कॅन, सोनोग्राफी व डायग्नोस्टीक तपासणीकरिता अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) द्वारे दर मागविण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेने सदरची सेवा उपलब्ध करुन देणे कामी खालील नमुद अभिव्यक्ती स्वारस्य धारकांची पॅनलवर नियुक्ती करण्यात आली आहे.

१. मे. निदान लॅबोरेटरीज ॲण्ड हेल्थ लिमिटेड, विरार (प.)
२. मे. लाईफ स्कॅन सेंटर, नालासोपारा (प.),
३. मे.श्री डायग्नोस्टीक सेंटर, विरार (प.), नालासोपारा (पू.), वसई (प.)
४. मे.मधुरा डायग्नोस्टीक सेंटर, विरार (पू.)
५. मे.सिद्धी डायग्नोस्टीक सेंटर, विरार (प.), नालासोपारा (प.), वसई (प.)

तसेच खालील नमुद चार श्रेणीतील सेवा महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी महानगरपालिकेने मंजुर केलेल्या सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

१. एम.आर.आय
२. सिटी स्कॅन
३. सोनोग्राफी
४. डायग्नोस्टीक तपासणी

महानगरपालिका रुग्णालयांत आंतररुग्ण विभागात किमान २४ तास दाखल अथवा वैद्यकीय आपात्कालीन स्थितीत २४ तास पेक्षा कमी वेळ दाखल असलेल्या रुग्णांकरिता संबंधित वैद्यकीय अधिक्षक/ वैद्यकीय अधिकारी यांनी लेखी स्वरुपात प्रमाणित केल्यास उपरोक्त सेवा पुरविण्यात येणार आहे. तसेच बेवारस, आश्रमशाळेतील विद्यार्थी व महिलाश्रमातील निराधार महिला यांना अभिव्यक्ती स्वारस्यधारकांमार्फत मोफत सेवा पुरविण्यात येणार असून सदर तपासणीचे देयक अदा करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

तरी सर्व नागरिकांनी महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सदर वैद्यकीय सुविधांचा लाभ घ्यावा.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका